| | |
|---|---|
| **MHNS240000522021** | <u>नियमित दिवाणी दावा क्र.०२/२०२१ मधील नि.क्र.२७ वरील आदेश</u><br><u>हिरामण लखन पिंपळसे</u><br>वि.<br>**कमाबाई गुमन  शिंदे** |

प्रस्तुतचा अर्ज प्र.वादी क्र.०९ व १० यांनी त्यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होउन त्यांची कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळण्याकरीत सादर केला आहे. सदर आदेश याच अर्जावर असल्याने अर्जातील कथनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्याचा याठिकाणी उहापोह करण्यात आला नाही.

२. वादी यांनी सदर अर्जावरच त्यांचा खुलासा दाखल करून प्र.वादी क्र. ०९ व १० यांच्या अर्जास प्रखर आक्षेप घेतलेला आहे. सदर वादीच्या कथनानुसार प्र.वादीने नि.क्र.२३ ला विलंब माफीचा अर्ज दिला, तो रक्कम रु.५००/– कॉस्टवर मान्य करण्यात आला. प्र.वादीने कॉस्ट न भरल्याने आदेश निष्फळ करण्यात आला. त्यामुळे प्र.वादी यांना सदर अर्ज करण्याचा अधिकार नाही. त्यामुळे त्यांनी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

३. उभय पक्षकारांच्या विधीज्ञांचा तपशिलवार युक्तिवाद ऐकला.

४. अभिलेखाची पाहणी केली असता वादी यांनी सदर दावा वाटप व ठरावाकरिता दाखल केलेला आहे. अभिलेखाची पाहणी केली असता, प्र.वादी क्र.०९ व १० विरुध्द झालेला विनाकैफियत आदेश त्यांना रक्कम रु.५००/– कॉस्ट करुन दि.२६/०७/२०२३ रोजी नि.क्र.२३ वर आदेश करुन मंजुर करण्यात आहे. प्र.वादी यांनी सदर आदेशाची पुर्तता न केल्याने नि.क्र. ०१ वरील दि. २०/०२/२०२४ रोजीच्या आदेशान्वये नि.क्र.२३ कडील आदेश निष्फळ ठरविण्यात आला होता. प्र.वादी क्र.०९ व १० च्या कथनानुसार ते मोलमजुरी कामी परराज्यात गेले होते. त्यामुळे त्यांना आदेशाची पुर्तता करता आली नाही. प्र.वादीतर्फे युक्तीवाद करण्यात आला आहे की, जर या प्र.वादींना संधी दिली नाही तर त्यांचे अपरिमित नुकसान होणार आहे. सदर दावा हा स्थावर मिळकती संदर्भात आहे. त्यामुळे दोन्ही पक्षकारांचे हक्कसंबंध गुणदोषारोवर सिध्द करण्याकामी परवानगी देणे नैसर्गिक न्यायतत्वाच्या दृष्टीने आवश्यक आहे. असे असले तरी, प्र.वादी यांस कैफियत दाखल करण्यास विलंब झाला आहे. तसेच नि.क्र.२३ कडील आदेशाची पुर्तता करण्यास देखिल विलंब झालेला आहे. परंतु सदर विलंब काही रक्कम खर्च म्हणुन त्यांच्याकडुन वादी यांना दिल्यास प्रकरणाचा उद्येश सफल होईल व सदर प्रकरण हे गुणदोषारोवर न्यायनिर्णीत होण्यास मदत होणार आहे. सदर अर्ज मंजुर केल्यावर उभय पक्षकारांमध्ये विविध प्रकरणे दाखल होणार नाहीत व गुंतागुंत वाढणार नाही. सबब, निम्न आदेश.

# आ दे श

०१. प्र.वादी क्र. ०९ व १० यांचा नि.क्र.२७ वरील अर्ज त्यांनी वादी यांना नि.क्र.२३ वरील आदेशासह अतिरिक्त कॉस्ट म्हणुन रक्कम रुपये २००/- खर्च देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

०२. प्रतिवादी क्र. ०९ व १० यांनी कलम ०१ मधील पुर्तता केल्यास त्यांना कैफियत अभिलेखावर सादर करण्याची परवानगी देण्यात येते.

SHIPKULE CHARUDATTA Digitally signed by SHIPKULE CHARUDATTA Date: 2025.06.10 15:56:55 +0530

**दि. १०/०६/२०२५** **(चारूदत्त उद्धव शिपकुले)**
**ठिकाण- सटाणा.** **दिवाणी न्यायाधिश क. स्तर, सटाणा.**